## प्रकरण चौथे

## द.मा. मिरासदार यांच्या कथालेखनाचे वाङ्मयीन गुणविशेष

### प्रास्ताविक

१) कथावस्तू

२) व्यक्तिचित्रण

३) संवाद

४) भाषाशैली

५) निवेदन शैली

६) कथांचे प्रारंभ

७) कथांचे शेवट

000

## प्रकरण चौथे

## द.मा. मिरासदार यांच्या कथालेखनाचे वाङ्मयीन गुणविशेष

### प्रास्ताविक :

तिसऱ्या प्रकरणात आपण मिरासदारांच्या कथामधील व्यक्तिचित्रांचा अभ्यास केला आहे. या प्रकरणामध्ये कथा वाङ्मयाच्या अनुषंगाने मिरासदारांच्या कथातील कथावस्तू, व्यक्तिचित्रण, संवाद, भाषाशैली, निवेदनशैली, कथांचे प्रारंभ व शेवट या घटकांचा अभ्यास करणार आहोत.

कथा या वाङ्मय प्रकाराचे हे विविध घटक आहेत. कथेचा परिणाम एकजिनसी असतो. हे मान्य करूनही या परिणामाप्रत जाणारी कथा या विविध घटकांच्या एकात्म आविष्कारातूनच जात असते. या घटकांचा स्वतंत्रपणे आलेला विचार कथेच्या आणि कथाकाराच्या सामर्थ्याचा प्रत्यय देण्यास सक्षम असतो. आणि म्हणून येथे कथा वाङ्मय प्रकाराच्या दृष्टीने अभिप्रेत असणाऱ्या घटकांचा विचार करावयाचा आहे.

### १) कथावस्तू :

आजपर्यंतच्या कथा वाङ्मयाकडे पाहिले तर असे दिसून येते की, कथेचे असंख्य विषय आहेत. कथेला कोणताही विषय चालतो. जीवनाच्या कोणत्याही घटकामधून कथेची कथावस्तू उचलता येते. जीवनातील असंख्य संघर्षात्मक प्रसंगातून नेमके कथाबीज शोधून प्रतिभावंत लेखक आपली कथानिर्मिती करीत असतो.

कथावस्तूचा खरा आधार घटनाप्रसंग आणि पात्रांचे स्वभावदर्शन यांचाच असतो. असंख्य नमुन्यांच्या पात्रातून निवडलेली वैशिष्ट्यपूर्ण आणि प्रातिनिधीक पात्रे व त्यांच्या भोवती गुंफल्या गेलेल्या घटना-प्रसंगातून चांगली कथा निर्माण होते. कथेत प्रसंग आणि स्वभाव एकजीव झालेले असतात. अर्थात संवाद, व्यक्ति-

चित्रण, निसर्गचित्रण, स्थलकालवातावरण निर्मिती इत्यादी गोष्टी महत्त्वाच्या असतात. वास्तविक पाहाता प्रत्येक कथावस्तू हे लेखकाला एक आव्हानच असते. तो मानवी जीवनाचा, मानवी मनाचा शोध असतो. अशा कथावस्तूला योग्य रूप देवून ती कथावस्तू यशस्वी करणे अवघड काम असते. त्यासाठी कथामांडणीचा विचार करता, एखाद्या विषयाची निवड केली म्हणजे, काय सांगायचे आणि कसे सांगायचे हे दोन टप्पे गृहीत धरून त्याची परिणामकारक अशी कलात्मक अभिव्यक्ती करण्याचे चातुर्य म्हणजे यशस्वी तंत्र होय. आपल्या कथा विषयात कोणतातरी समरप्रसंग असणे अगत्याचे ठरते. प्रा. फडके म्हणतात, "कोणत्याही प्रकारचा समरप्रसंग म्हणजे कथेचा आत्मा होय." [१] हा संघर्ष अनेक पातळीवरचा असू शकेल. व्यक्तीमधील संघर्ष, व्यक्तीप्रसंगातील संघर्ष, मनामनातील संघर्ष असा नेमका संघर्षविषय टिपून काढल्यावर अनावश्यक गोष्टींची वजाबाकी करून, अत्यावश्यक व अपरिहार्य तेवढीच पात्रे आणि प्रसंग, अत्यंत काळजीपूर्वक निश्चित केले पाहिजेत. या निश्चितीनंतर कथेचा प्रारंभ आणि शेवट विलक्षण कौशल्याने साधला तर कथा प्रभावी ठरेल. कथेचा प्रारंभ जसा वेधक आणि महत्त्वाचा तेवढाच शेवटही काळजीपूर्वक, दक्षतेने करावा. कथेच्या शेवटाबाबत प्रा. फडक्यांच्याच शब्दात सांगायचे तर "ज्या ठिकाणी लघुकथा संपते, त्याठिकाणी तिच्यातली हकीकत संपते पण विषय संपत नाही....गीत संपते तरी श्रोत्यांच्या मनात त्याची "धून" चालू रहाते ना, तशातलाच हा प्रकार आहे. ... गोष्टीचा परिणाम किंवासंस्कार तिच्या अखेरीस संपत नाही तर एक प्रकारे सुरू होतो आणि काही वेळ तरळत राहतो.—तशातलीच ही गोष्ट आहे. आणि असं झालं म्हणजे लघुकथेचा शेवट एकंदर जीवन प्रवाहाशी सांधल्यासारखा वाटतो." [२]

कथावस्तूच्या वरील मीमांसेच्या अनुषंगाने आपल्याला मिरासदारांच्या कथांतील कथावस्तूंचे सामर्थ्य अजमावता येईल.

मिरासदारांच्या "माझ्या बापाची पेंड" आणि "गप्पागोष्टी" या दोन कथासंग्रहातील कथाच्या कथावस्तूंचा शोध घेताना, आपणास असे दिसते की बहुतांश कथांच्या कथावस्तू या ग्रामीण जीवनातील संघर्षातून स्विकारलेल्या आहेत. "कोणे एके काळी" सारखी एखादी अपवादात्मक कथावस्तू ऐतिहासिक वातावरणातील आहे.

मिरासदारांच्या सर्वच कथातील कथावस्तुंना वास्तवाचा आधार आहे. वास्तवाच्या दृढ पायावर या कथावस्तू आधारित आहेत. समाजजीवनात घडणा-या, सर्वसामान्य वाचकांच्या दैनंदिन जीवनात प्रत्ययाला येणा-या त्यांच्या कथावस्तू आहेत. शालेय वातावरणाशी निगडीत असणा-या कथा तर शाळा, मास्तर, विद्यार्थी यांचा सुंदर मिलाफ होऊन अवतरल्या आहेत. तसेच ग्रामीण भागातील कुटुंबसंस्था, भाऊबंदकी, एखादा अति गुण-अवगुण असणारी व्यक्ती, बेरकी, धूर्त, कलंदर, दिलदार, मनमोकळया स्वभावाच्या व्यक्ति यांसारख्या कथावस्तूतून मिरासदार ग्रामीण वास्तव उभे करतात. या कथावस्तू नैसर्गिक आणि स्वाभाविक वाटतात.

वास्तवतेबरोबरच मिरासदारांच्या कथावस्तूंना कल्पकतेचा व सुक्ष्मनिरिक्षण शक्तीचा स्पर्श आहे. आपल्या अचाट कल्पनाशक्तीने व सुक्ष्म निरीक्षणाने त्यांच्या कथावस्तू सजलेल्या आहेत. तसेच अपवादात्मक कथांवस्तूमधून ते अतिशयोक्तीचाही वापर बेमालूमपणे करतात.

मिरासदारांच्या कथेचे विषय, कथांची व पात्रांची नावे त्या त्या कथावस्तूला शोभणारी आणि कथावस्तूमध्ये अधिक भर टाकणारी, कलात्मकता आणून देणारी आहेत.

२) व्यक्तिचित्रण :

कथा म्हटले की व्यक्तिचित्रणाला महत्व आलेच. कारण कोणातीही घटना

ही कथागत व्यक्तीच्या जीवनाभोवतीच निर्माण झालेली असते. घटनाप्रधान कथेतदेखील पात्रांचा समावेश असतोच. त्यामुळे पात्रांचे चरित्रचित्रण किंवा व्यक्तिचित्रण हे कथानक, घटना, वातावरण या सर्वांशी संबंधित असते. आणि त्या प्रत्येक अंगातून व्यक्ती जीवनाचेच अनेक पैलू प्रकट होत असतात. त्यामुळेच कथेत व्यक्तिचित्रणाला महत्व असते. अर्थात कथेची मर्यादा लक्षात घेता व्यक्ति-चित्रणालाही मर्यादा पडतात हे लक्षात ठेवले पाहिजे.

घटनाप्रधान कथा आणि स्वभावप्रधान कथा असे कथेचे मुख्य प्रकार मानले तरी त्यातल्या त्यात व्यक्तिचित्रणाला म्हणजेच स्वभाव प्रधानतेला अधिक महत्व असते. अनेक प्रकारच्या छटा मानवी स्वभावात असतात.— बिलंदर, बेरकी, इरसाल खोडसाळ, वाह्रट, प्रेमळ, कंजूष, झोपाळू. याबरोबरच कथागत पात्रे यशस्वी, यथार्थ होण्यासाठी त्या पात्रांच्या रंगरूपासह, त्यांची वेशभूषा, त्यांची भाषा, त्यांच्या आवडी-निवडी, त्यांच्या विशिष्ट सवयी, लकबी इत्यादी सर्व गोष्टींचे बारकाव्याने निरिक्षण करून चित्रण केले जाते.

मिरासदारांच्या कथातील प्रधान आणि गौण पात्रे यांचे स्थान आणि वैशिष्टये याचा आपण तिसऱ्या प्रकरणामध्ये विचार केलेला आहे. येथे मिरास-दारांच्या व्यक्तिचित्रण कौशल्याचे विशेष संक्षेपाने पहावयाचे आहेत.

मिरासदारांची बहुतांश कथा प्रसंगनिष्ठ आहेत. प्रसंग निर्माण होतात ते अखेर व्यक्तिमुळेच. मिरासदारांच्या कथातील प्रसंगनिर्मितीला या व्यक्ती, त्यांचे नमुनेदार, विक्षिप्त आणि तऱ्हेवाईक असे स्वभावच कारणीभूत आहेत. मिरास-दारांच्या काही कथा प्रत्यक्षातल्या माणसांच्या हकिगतीमधूनच निर्माण झाल्या आहेत. कारण यातील काही माणसे त्यांना प्रत्यक्ष भेटलेली, काही त्यांनी ऐकलेली आहेत. तसेच मिरासदारांना माणसाबद्दल अधिक ओढ आहे. मिरास-दारांच्या कथामधून डोळ्यापूढे माणसांचे कितीतरी नमुने उभे राहतात. या व्यक्तींना अस्सल ग्रामीणतेचा स्पर्श आहे. वास्तवातून आलेल्या या व्यक्ति नेहमी स्मरणात राहतात.

पेंड खाऊन पेहणावला जाणारा धायगुडे (माझ्या बापाची पेंड), भांडखोर अण्णा देशपांडे आणि घुम्या राघू देशपांडे (भाकरी), धापावरच जगणारा आणि जगविणारा नाना घोडके (नव्याण्णवबादची एक सफर), बेरकी तुका पैलवान (कळस), गणपत वाघमोडे (निकाल), इरसाल सोन्या बामण (सोन्या बामण), पोटासाठी आपले बुध्दिचातुर्य विकणारा वक्रतुंड (कोणे एके काळी) अमानुष वृत्तीचा बापूदेव (रानमाणूस), झोपेचा बळी झालेला नागू गवळी (झोप), मास्तरलाच नवी "इद्या" शिकविणारा व्यंकू (व्यंकूची शिकवणी), एकान्त मिळताच जरा "सरकणारा" इनामदाराचा जावई (हरवल्याचा शोध), बायकोच्या कचाटयात सापडलेला प्रो. सदाशिवराव (एक सदाशिवराव आणि त्यांची बायको), दैनंदिन जीवनाला सामोरे जाताना चोरी सारख्या प्रकाराकडे वळणारा दत्तू चष्मेवाला (मुलें पळविण्याचा प्रकार), शिक्षकी पेशाविषयी फालतू आत्मविश्वास बाळगणारा भिकू मुंगळे (वर्गातील एक पाठ), गणा मास्तर, शिवा जमदाडे, नारायण चेंगट, बाबू ही समस्त भोकरवाडीकर मंडळी (मदत), काका सोनार, सुताराची आनशी, तांबटाची बायको ही "चुकामूक" घडविणारी मंडळी (चूकामूक) अशा कितीतरी व्यक्तींनी आणि वल्लींनी मिरासदारांचे कथालेखन भरलेले आहे. कुठेही भडकपणा, आक्रस्ताळेपणा न करता ही पात्रे त्यांच्या विशिष्ट लकबीसह अवतरतात.

३) संवाद :

संवादाला कथेमध्ये इतर घटकाबरोबरच स्थान असते. संवादाचा कथेमध्ये वापर करताना लेखकाला अतिशय काळजी घ्यावी लागते. काही अभ्यासकांनी कथेची व्याख्या करताना कथा म्हणजे "संवादात्मक चित्रशिल्प" असे म्हटलेले आहे. नाटकाइतके कथेत संवादाला महत्व नसले तरी पात्रांचे अंतरंग समजण्याच्या दृष्टीने, कथेला गतिमानता येण्याच्या दृष्टीने आणि योग्य असे वातावरण तयार करत कथेचा विकास करण्याच्या दृष्टीने कथेत संवादाचे अतिशय महत्व असते.

कथेतील संवादातून घटित घटना आणि त्याबद्दलची पात्रांची क्रिया-प्रतिक्रिया समजू शकते. तसेच पात्रगत संवादातून लेखक स्वतःचा जीवनविषयक दृष्टिकोण मांडू शकतो. कथेच्या यशस्वीतेसाठी, बांधेसूद मांडणीसाठी संवादाचा अतिशय चांगला उपयोग होतो. संवादामुळे कथेत प्रवाहीपणा व सजीवता उत्पन्न होते, कुतूहल निर्मिती करता येते. कथेतील संवाद संक्षिप्त खटकेबाज व सुटसुटीत असावेत. संवाद हे सहज, स्वाभाविक आणि वास्तव वाटले पाहिजेत. पात्रांच्या कुवतीनुसार म्हणजेच पात्रोचित संवाद असावेत. संवादातून कथागत पात्रांचे व्यक्तिचित्रणही होत असते. म्हणूनच पात्रांचे मनोगत, त्यांचे विचार-विकार, त्यांच्या भाव-भावना संवादातून प्रकट व्हाव्यात. इतकेच नव्हे तर संवादात जिवंतपणा येण्यासाठी वाक्याइतकीच त्या त्या व्यक्तीची शारीरिक हालचालही बोलकी असते. त्यांच्या विशिष्ट लकबीसुध्दा फार मोठा आशय सांगून जातात.

मिरासदार हे कसबी लेखक आहेत. वास्तव वर्णने आणि प्रत्ययकारी संवाद याद्वारे आपल्या कथावस्तुचा उत्तम विकास करतात. संवादामध्ये ग्रामीण बोलीचा व भाषेचा वापर त्यातील खाचाखोचासह मिरासदारांच्या कथेत आढळतो आणि त्यामुळे त्यांच्या कथांना एक वेगळीच लज्जत येते. त्यांच्या संवाद कौशल्याचे अनेक नमुने आपणास त्यांच्या कथेत पहावयास मिळतात.

"झोप" कथेतील नागू गवळी आपण काहीतरी अजब करून दाखविण्याचे मनोगत आपल्या बायकोला सांगायचा त्यावेळेचा त्याचा संवाद मिरासदार खुमासदारपणे रंगवितात.

"दिवसा तो नेहमी बायकोला म्हणे, "ह्या झोपेनं माजा लई सत्यानास केलाय बग. काय करावं ! कुठं जाता येत न्हायी, येता येत न्हायी. काय निगालं काम तर उटवीत जा की गं मला रातच्याला. आं ?"

बायको गव-या थापता थापता म्हणे,

"कुंभकर्न हायेत दुसरे तुमी. कुनी उठवावं तुमास्नी ?"

"अगं न्हायी तसं. उटव मला. बग उठतो का न्हायी ते."

"काही उटत न्हायी. मुड्यावानी पडताय तुमी."

"उटव तर खरं. हलव गदगदा. बगू."

यावर बायको मान हलवून आणि हात ओवाळून म्हणे,

"हा... हालीव म्हनं गदगदा ! समदं करून बघितलय म्या. उटवाय गेलं तुमास्नी तर "टक्के रांडं" करून शिव्या देता तुमी झोपंत."

हे बोलणे ऐकून नागूला एकदम राग येत असे. नागपुड्या लाल करून आणि फुगवून तो म्हणे,

"कोन म्या शिव्या देतो ? हॅट.... खोटं बोलू नगस उगीच, टक्के... उटत न्हायी तर पान्याची घागर वत टाळक्यावर माज्या."

"ते बी केलतं की मागं."

"आ ? .... आन् ते कवा ?"

"तुमच्या हातरूनात साप निघाला तवा. एक का दोन घागरी वतल्या की भदभदा."

"मग ?—उटलो का न्हायी मी ?"

"ऊं .... उटताय! पान्यानं समधं जिमीनीचं पोपडं निगालं, पन तुमी आपलं हिम्म. हलला सुदीक न्हायीत की वो जागचं ! "

"अगं मग सापच सोडायचा का न्हायी त्यो अंगावर ?"

"त्यो तुमच्या अंगाखाली कवाच मेला. चेंदामेंदा झाला नुस्ता. तुमच्या अंगाखाली घावल्यावर हात्तीबी जित्ता न्हायचा न्हायी."

"बरं बरं, आता ह्याफुडं उठवीत जा." [3]

नेहमीच्या पध्दतीच्या वर्णनातून नागूच्या झोपेच स्वरूप सांगता आलं नसतं इतक या संवादाद्वारे मिरासदारांनी ते परिणामकारकपणे कथन केलय.

नागुला आपल्या झोपेच्या सवयीचा वैताग आलेला आहे. पण तो त्या सवयीचा गुलाम झाल्यामुळे बाष्कळ बडबडीशिवाय काहीच करु शकत नाही. उलट त्याची बायको आपल्या या ऐतखाऊ झोपाळू नव-याबरोबरचा संसार समजुतदारपणे आणि सोशिकपणे निभावून नेते.

"मुले पळविण्याचा प्रकार" या कथेतील दत्तू चष्मेवाला आणि त्याची पत्नी यांच्यातील संवादातून त्यांच्या कौटुंबिक दारिद्र्याचे आणि त्यांच्या सामान्य स्वप्नांचे दर्शन मिरासदार घडवतात.

मुलांची सगळी व्यवस्था कडेकोट बंदोबस्तात केल्यावर दत्तुने पत्र लिहायला घेतले. पेन्सिल जिभेला लावून तो प्रेमळपणाने बायकोला म्हणाला,

"गंगे, किती लिहूं ग ? पांच हजार लिहूं का दहा हजार ?

तू सांगशील तसं. आज आपली तब्येत खुष आहे."

गंगी मुरका मारुन म्हणाली,

"या बया! मला वो काय कळतंय त्यांतलं ?"

"तरी पण, सांगशील तर खरं."

"मारवाडी लई चिकाट हाये. पैसा सोडायचा न्हाई."

"त्याचा बाप सोडील. पोरंगं नगं का परत त्याला ?"

"इत्का पैसा आसला तर दील."

"पैसा आसंल, गठुड्यांत घालून पुरला आसंता."

"पांच हजार लिवा मग."

"बरं".

"अन्, पैशे मिळाले म्हंजे पयले झूट सिनेमाला जायाचं बरं का, सांगून ठिवते आधींच."

दत्तू ऐटींत म्हणाला,

"ह्यें:! फस्ट क्लासची तिकटं काढू की."

"मग हाय का ?"

"अन् समयास्नी कापडं आना आधी."

"एकदम मांजरपाटाचा तागाच घेऊन ठिवूं, कीं, धा धा कपडे करूं झोकांत. शिंप्यानं नुस्तं म्हैनाभर कापडाच फाडीत असलं पायजे आपलं, टर्रर्रर्र ...."

"आन् जोंधळं बी."

"आसं हाव-यासारखी काय करतीस गं ?

पोतभर जवारी आणून ठिवतो की, मग हाय का ? खावा, किती भाक-या खायाच्या तेवढ्या खावा."

"अन् गूळ"- गंगीला आठवण झाली.

"गूळ, गहूं, समदं आणातो. रोज गुळवणी अन् पोळया. खावा तिच्या मायला. राजाच्यावर खानापिना झाला पायजे."

"मग ल्हया पांच हजार."

"तेंच म्हणातोय गं प्री—"

असें म्हणून दत्तूने पुन्हां एकदां पेन्सिल जिभेला लावली. मग हळूहळू त्याने पत्र लिहिले.[४]

दत्तू चष्मेवाल्याच्या आणि गंगीच्या वरील संवादातून मिरासदार घरच्या दारिद्र्यग्रस्त परिस्थितीचे, चोरीतून मिळालेल्या रकमेची विल्हेवाट कशी लावायची या क्षणीक सुखाचे, पति-पत्निच्या कौटुंबिक नात्याचे वास्तवपूर्ण रेखाटन करतात. स्त्री स्वभावाच्या उतावळेपणाचे दर्शनही या संवादातून घडते.

"काकांची गंभीर गोष्ट" या कथेतील एका संवादातून काही लोक व्यवसाय-धंद्यानिमित्ताने किंवा आपल्या पेशानुसार कशी वागतात आणि बोलतात याचा प्रत्यय येतो. या संवादातील शिपाई तर सरकारी नोकर आहे.

आपण आणलेले प्रेत हे काका गंभीर या गृहस्थाचे नाही हे विशापंत, रामभाऊ, डोंगरे यांना स्मशानात कळताच ते परत हॉस्पिटलमध्ये येतात. तर तेथे "डेड बॉडीज वॉर्ड, मधला शिपाई जागेवर नव्हता. एक राखणदार तेथे

आला. आपण इथे राखणीला नुसते आहोत, त्याच्या कामात ढवळाढवळ करण्याचा आपल्याला काहीहि अधिकार नाही, असे त्याने सांगून टाकले . तेव्हा आलेली मंडळी मटकन् खालीच बसली.

"विशापत अगदी मेटाकुटीला येऊन म्हणाले ,

"अरे बाबा, असं काय करतोस ? चूक तुमची अन् ताप आम्हालां ? वा.!"

राखणादार स्वारी अडाणी असली तरी सरकारी नौकर होती. त्या नौकरीला शोभेल अशा संथपणाने ती म्हणाली,

"चूकबीक समदी सकाळी बगू साहेब. या वक्ताला काई न्हाई. तंवर थांबा, मारत्याबी यीलच. सकाळच्याला आता काय शिंगं राहिलीत ?"

हे ऐकल्यावर अंगावर कांटाच आला.

"आं ? अन् हा तुमचा मुडदा ? त्याचं काय करायचं ?"

"ठेवा तुमच्या जवळ, नाय तर घरी येऊन जावा."

"अन् आमचा मुडदा ?"

"सकाळी मिळेल."

"अरे वा.! शहाणाच आहेस."

"मुड्यांची समदी जबाबदारी आमच्यावर हाये साहेब. तुमची माजी वळख का पाळख ? उगीचं कुणी गावातलं एखादा मुडदा आणील अन् घ्या म्हणील. तसं कसं जमल ? आमी सायेब आमचेच मुडदे घेत असतो. दुसऱ्यांचे घेत न्हाई."

"मग आता सकाळपर्यंत थांबावं म्हणतोस ?"

"हां."

"अन् तिकडे चिता रचून ठेवली आहे तिचं काय करतोस ? का मी पडूं आडवा तिच्यावर ?" रामभाऊंना झीटच आली.

"ते मी कसं सांगू सायेब. दुसरं कुणी आलं तर देऊन टाका त्येस्नी. नाय तर डाक्टरला भेटा तंवाच्या."[5]

कामचुकार, बेपर्वा अशा कोणात्याही सरकारी नोकरांचा प्रतिनिधी ठरावा असा हा वरील संवाद आहे. या कथेतील सरकारी नोकर भावनेपेक्षा तांत्रिक नियमावर भर देतो आणि चाळकरी मंडळी संकटात सापडल्यामुळे घाय-कुतीला येऊन विनवणी करताहेत याचा प्रत्यय मिरासदार वरील संवादातून देतात. विशापंत, रामभाऊ, डोंगरे या चाळकरी मंडळींची तशी चूक काहीच नव्हती आणि त्या हॉस्पिटलच्या शिपायाचीही चूक नव्हती. परंतू काम आटोपण्याच्या घाई-गडबडीत कोणाचेच लक्ष आपल्या कामाकडे नसते आणि नको तो घोटाळा घडून येतो. परस्पर विरोधी अशा मानवी स्वभावाचा आणि आपल्या सोयीनुसार काढलेल्या पळवाटांचा नमुना म्हणून वरील संवादाकडे पहावे लागेल.

"मदत" कथेमध्ये पुण्यातील जलप्रलय झालेल्या लोकांना मदत करण्यासाठी समस्त भोकरवाडीकर मंडळी गणा मास्तरांच्या घरी जमलेली आहेत. त्या वेळे-च्या संवादातून विसंगतीचे कसे दर्शन घडते पहा -

—"शेवटी चेंगटाच्या तोंडाला आऽऽ करून रग लागली. गणा मास्तराकडे तोंड करून तो काळजीच्या सुरांत म्हणाला,

"मग ? कसं काय ठरलं पुन्याचं!"

रामा घरात बाहेर जाऊन गुळणीतला कांही भाग टाकून आंत येऊन बसला. म्हणाला,

"चेंगट तूं गप पड बंर. उगीचं लहान लेकरानं मधीमधी कालवा करू ने. टाईम काय आन् गाढवा तूं बोलतूस काय ?"

चेंगट नाराज झाला. तक्रारीच्या सुरांत बोलला,

"आतां मी काय केलं ? निक्कं इचारलं."

"काय इचारलं ?"

"आतां हेंच की आपलं पुण्याच कसं काय ठरलं ?"

"काय ठरायचंय, पुन म्हंजे काय बाई बिई हाय का तिचं लगीन बिगीन ठरायचं हाय ? गाडव माणूस."

शिवा वाघमोडे नमस्काराची घडी मोडून म्हणाला,

"पुरं की लेकानुं तुमचं भांडान. टाईम काय आन् तुमचा ह्यो दंगा व्हय ?
असल्या चाबरटपनानं धरण फुटलं आसंल पुण्याचं."

"ते कसं काय ?"

"धरनावरचं कामगार बसले आसतील आसंच रिकामं तोंड वाजवीत. पानी येऊन त्यांच्या बुडाखालन पशार झालं तरी त्यांना सुध्द नसंल. मग काय ?
"ठो !" करून धरन फुटलं आसंल." ६

मिरासदारांनी वरील संवादातून शाब्दिक फटमार करीत "वडाची साल पिंपळाला जोडणे" या म्हणीचा प्रत्यय आणून दिला आहे. वास्तविक पाहता पुण्यामध्ये जलप्रलय होणेही नैसर्गिक घटना, परंतु शिवा वाघमोडे पुण्यातील जलप्रलयाचा संबंध रामा खरात आणि चेंगटाच्या भांडणाशी जोडतो व आपण फार महत्त्वाचे, योग्य, मार्मिक बोललो असे त्याला वाटते. मिरासदारांनी शिवा वाघमोडेंच्या अज्ञानावर जाता-जाता नेमके बोट ठेवण्याचा प्रयत्न वरील संवादातून केलेला आहे.

"कोणे एके काळी" या कथेतला चतुर, हजरजबाबी, विद्वान, मुत्सद्दी, धाडशी आणि शूर असा विदूषक, नियतीने आपल्या वाटेला आलेले दु:ख केवळ विनोदाच्या सहाय्यानेच झाकून टाकतो. सोमशर्माचे हे दु:ख अबोल आहे.

अनेक प्रयत्न करून सोमशर्मा मोहिनीला आपल्या राजासाठी वश करतो. पण प्रत्यक्षात मोहिनीच्या तोंडून ज्यावेळी सोमशर्मा सर्व हकिगत ऐकतो तेव्हाच्या संवादातून त्याच्या मानसिक संघर्षाचा प्रत्यय येतो. मिरासदार क्वचितच असे मानवी मनाच्या गहिरेपणात शिरताना दिसतात.

मोहिनी आपल्या भावी पतिबद्दलच्या सर्व कल्पना मनमोकळेपणाने सोमशर्माला सांगते. त्यावेळी सोमशर्माची स्वगतातून प्रकट झालेली अवस्था पहा -

"हे बोलणे ऐकताना माझे हृदय दुभंगून जात होते आणि विचारशक्तीच्या चिंधड्या उडत होत्या. मी उरात फुटत होतो. ओहोटीसारखे माझे सामर्थ्य कमी कमी होत होते आणि तरीही सागरासारखी निश्चलता मुखावर ठेवून मला चालावे लागत होते.

शोकटी सोसवेना तेंव्हा कपाळ हातांनी दाबून धरीत मी विव्हलपणे म्हणालो,

"पुरे - पुरे आता हे."

मी तिच्याकडे पाहिले नाही, पण माझ्या अनुचित बोलण्याने तिला दु:ख झाले असावे आणि आश्चर्यही वाटले असावे. मला केवळ तिचे शब्द ऐकू आले,

"का बरे ? काय झाले ?"

.....

मोहिनीने पुन्हा चकित होऊन विचारले,

"का हो ? असे झाले तरी काय तुम्हाला ?"

वाटले की जिवाचा आकांत करून तिला सगळे सांगावे. त्या आवेगात दु:खाने बधिर झालेल्या माझ्या शरीराचा मोहरा मी तिच्याकडे वळविलाही. म्हणालो,

"मोहिनी"

पण मी एवढाच शब्द उच्चारू शकलो. तेवढयात महाराजांनी पाठविलेल्या विशेष दुतांबरोबर मोहिनी निघून गेली."[6]

इतरांच्या सुखात आनंद मानणारा आणि त्यासाठी स्वत:चे दु:ख अबोलपणे जाणाऱ्या विदूषकाच्या भावस्थितीचे उत्कृष्ट दर्शन या संवादातून/स्वगतातून आपणास घडते.

मिरासदारांच्या कथालेखनातील संवाद हे मार्मिकपणे उतरले आहे. पात्रांच्या तोंडी ग्रामीण बोलीचा वापरते बेमालुमपणे करतात. निवेदनासाठी नागरी भाषेचा वापर करतात. त्यामुळे त्या संवादात वास्तवता येते. संवादामुळे नाटयात्मकता येतेच शिवाय पात्रांचे स्वभाव, मनोदर्शन, विशिष्ट लकबी, सवयी यांचीही ओळख चटकन होते. मिरासदारांचे संवाद उत्कंठावर्धक आहेत. कथानक पुढे नेण्यात संवादाचा उपयोग करण्याचे कौशल्य मिरासदारांनी चांगले हाताळले आहे. संवादाची भाषाशैली पात्रानुरुप, नैसर्गिक व स्वाभाविक अशी आहे.

SARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

मर्यादा :

मिरासदारांच्या कथेतील संवाद कधी कधी फारच लांबलचक वाटतात. तसेच त्यांच्या संवादातून मानसिक संघर्ष क्वचित जाणवतो. कधी कधी संवाद ओढून-ताणून आणल्यासारखे वाटतात.

"नव्याण्णवबादची एक सफर" या कथेमधील नाना व एका ब्राह्मण माणसाचा संवाद पहा. दोघांच्या परिचयासाठी मिरासदारांनी उगीचच पाल्हाळ लावून संवाद लांबलचक केलेला आहे. तेच काम दोन-चार वाक्यात झाले असते.

"नाना हसला आणि म्हणाला, "कसा पावणे. लई घाबरे झालाय तुमी."

"होय".

असे म्हणून तो ब्राह्मण झाडाच्या बुंध्याला टेकून रेलला. गप्प बसून राहिला

जवळ माणूस असल्यावर नानाला गप्प बसवत नसे. त्यानेथोडा वेळ त्याच्याकडे टक लावून बघितले, मग विचारलें,

"कुठले ?"

"नरसिंगपूरचा".

"तिकडं कुट निगाला ?"

"गिरीला गेलतो. व्यंकटेशाचा प्रसाद आणलाय. तो द्यायला यजमानाकडे चाललोय दहिवडीच्या. गावं येत येत चाललोय."

"मग आम्हाला द्या की राव देवाचा प्रसाद."

"घ्या की. देवाच्या प्रसादाला नाही कोण म्हणेल?"

असे म्हणून त्या ब्राह्मणाने बोचक्यातला बटवा काढला. हळदकुंकू दिले. आणि वाळून कोळ झालेला चिमूटभर शिरा नानाच्या हातावर ठेवला.

नानाने प्रसाद तोंडात टाकला. हाताचा तळवा, बोटे चाटून चाटून साफ केली. मग विचारले,

"प्रसादाला गुन हाय का हो ह्या ?"

ब्राह्मण बोचके बांधीत आश्चर्याने म्हणाला, "गुण आहे का म्हणजे ?"

"न्हायी, काय काय प्रसादाला लई गुण असतो म्हणत्यात. धरल ती विच्छा पुरी हुती."

ब्राह्मण हसला. म्हणाला, "तुमची काय इच्छा आहे ?"

नाना पहिल्यांदा घुटमळला. थांबला. मग अखेरीला त्याने आपली इच्छा आडपडद्याने सांगितली. ते ऐकून ब्राह्मण म्हणाला,

"बगू तुमचा हात."

आणि मग नानाने धोतराला पुसून पुढे केलेला उजवा हात हातात घेऊन तो बारकाईने बघत राहिला.

"होईल. या मार्गशीर्षात तुमचं लग्न होईल. भक्कम योग आहे."

नाना चकित झाला, हरखला. म्हणाला,

"आं! मार्गशीर्ष तर आठा दिवसावर आला."

"येऊ दे. पण मार्गशीर्षात तुमचं वाजतंय म्हणून समजा."

"खर म्हनतां ?"

"अगदी खरं. पण त्याला काही ठराव आहेत. ते मात्र पाळायला पाहिजेत."

"काय ठराव हायेत ?"

"सगळा देव देव नीट करायला पाहिजे."

"करीन की. सधा बी करतूच. दर शनवारच्याला मी नेमानं वाटीभर तेल घालतो मारूतीला."

"घालीत जा - आन् मांसमच्छर खायचं नाही."

"आपुन बाबा कधीच खाल्लेलं न्हायी त्ये."

"चोरी, चहाडी, शिंदळकी करायची नाही."

"छ्या:!"

BARR. BAL... ...KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

"खोटं बोलायचं नाही."

"न्हायी."

"मग होईल तुझं लग्न."

असे म्हणून ब्राम्हण उठला आणि गावात निघाला. खांधावर बोचके टाकून झापाझाप गेला. बोळात वळून दिसेनासा झाला."[८]

अशी अपवादात्मक स्थळे सोडल्यास मिरासदारांच्या कथेतील संवाद हे वास्तव, सहज, स्वाभाविक वाटतात. कथेच्या यशामध्ये मिरासदारांच्या पात्रांच्या तोंडचे संवाद फार मोठे कार्य करतात.

४) <u>भाषाशैली</u> :

कथेच्या इतर घटकांचा विचार करीत असताना प्रामुख्याने भाषाशैलीचाही विचार करावा लागतो. कारण कथेच्या सर्वांगाना व्यापणारे असे हे व्यापक तत्व आहे. कथेची भाषाशैली साधी, सरळ पण रोचक असावी. उपमा, दृष्टांत, अलंकार यांचा वापर कथेत घटनेच्या, पात्रांच्या आणि एकुणच कथेच्या उभारणीत योग्य वाटेल असा करावा. लघुकथेत तर भाषा आणि शैली याकडे विशेष लक्ष देणे आवश्यक असते. भाषाशैलीत लेखकाच्या भावभावना आणि विचारांचा ओघ प्रभावीपणे व्यक्त होतो. त्यामुळे प्रत्येक लेखकाच्या व्यक्तिमत्वानुसार ही भाषाशैली भिन्न-भिन्न प्रकारची असलेली दिसून येते. प्रत्येक लेखकानुसार ही शैली स्वयंभूपणे व्यक्त होत असते; म्हणूनच "स्टाईल इज द मॅन" असे म्हटले जाते.

मिरासदारांची ग्रामीण कथा ही लेखकाने अनुभवलेल्या ग्रामीण जीवनातून प्रेरणा घेऊन आलेली आहे. ग्रामीण जीवनाचा अनुभव घेत असतानाच लेखकाने ही ग्रामीण भाषा जगलेली, भोगलेली आहे. त्या जीवनानुभवाशी ती एकरूप आहे. म्हणूनच लेखकाने ग्रामीण भाषाचा वापर अपरिहार्यपणे केला आहे.

मिरासदारांच्या कथांची भाषा ही सर्वार्थांनी कथाव्यांनी जे व्यक्त होत असते त्यांची भाषा असते. ज्या अनुभूती कथारूप घेतात त्यांचीच ती भाषा असते. ती जेव्हा एखाद्या प्रसंगाचे चित्र रेखाटू लागते तेव्हा स्वाभाविकच उपमेयाबरोबर उपमानेही ग्रामजीवनातून येतात. भाषा व ती ज्या जीवनाविषयी बोलते यांचे नाते किती जवळचे असते याची कल्पना तेव्हा येते.

मिरासदारांच्या ग्रामीण जीवनाशी निगडित असणाऱ्या उपमा कथानिवेदनाची रंगत खूपच वाढवितात. "कुत्र्याला गोळी घातली म्हणजे मरताना ते असेच पेस गाळीत असते..."(माझ्या बापाची पेंड), दाढी वाढलेले मास्तर एखादा पाचोळा जावा तसे जात", "मग आषाढातला ढग गडगडावा तसा आवाज काढून तो ओरडला". "शेतांना लपेटीत जाणारा पाट एखाद्या टोपपदरी लुगड्याच्या काठासारखा दिसे, (भावकी), "गाडी अडखळत अडखळत, धबकत स्टेशनात शिरते. एखाद्या तोतऱ्या मुलाच्या बोलण्यासारखी (रानमाणूस), "चांदणं पिठासारकं पडलेलं, नाना तरसासारखा झुलत झुलत जाई". (नव्याण्णवबादची एक सफर), "अंधार पडायला लागला की नागूचे डोळे पाखरासारखे मिटत", "नागू गवळी चित्रातल्या मारुतीसारखा गुटगुटीत दिसे (झोप), "एखादा तांबडा मारुती रस्त्यावरून चालावा त्याप्रमाणे मी चालत असे. हत्ती झुलावा त्याप्रमाणे मी झुलत असे", "कनातीत ही गर्दी उसळली होती. माणसांच्या अंगावर माणूस नुसते पडत होते. बंदूकीत दारू ठासून भरावी त्याप्रमाणे ठासून भरली होती" (व्यंकूची शिकवणी) "ती साळुंखीच्या आवाजाने बोलणारी बाई माझ्याकडे टक लावून बघू लागली....तिची अंगलट चिंचेच्या फोकासारखी लवचिक वाटत होती आणि अंगोपांगावरून तिचा तरुणपणा रसरसत होता." (हरवल्याचा शोध), "मग एकदम वीज कडाडल्यासारखा आवाज आला" (माझा कै. वृत्तपत्रव्यवसाय), "आतां तूच सांग आभाळच फाटलं आसंल तर ठिगळ कुठवर लावंल माणूस १ अॅं १, "रामा खरातच तोंड धरून आणलेल्या कुत्र्याच्या पिलासारखे दिसत

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

होते" (मदत), "तीरावरची वृक्षराजी ध्यानस्त पुरुषाप्रमाणे निश्चल उभी होती", "पर्जन्याचा थेंब जसा सहजपणे भूमीच्या आधीन होतो तसे सगळेजण सहजपणे निद्रेच्या आधीन झाले होते." (कोणे एके काळी), "घरी पेवं ज्वारीनें भरलेली होती. रानांत ऊसं बारा महिने उभा होता", "एहेरे पठ्ठे! चालल्या बगा बोक्काबायरानांत. आदि म्हणावं, झिंज्या आवर मग शेतकी कर" (गणपत पाटील). अगदी सहज टिपलेली ही वाक्ये. मिरासदारांच्या कथेच्या उभारणीत या भाषेचा वाटा फार मोठा आहे. विशिष्ट वातावरण-निर्मितीला ती सहजपणे मदत करतात.

मिरासदारांच्या कथा ह्या खास "मिरासदारी" आहेत. कथेतील सगळीच माणसे वल्ली आहेत, रत्ने आहेत. त्यांचे वागणे, बोलणे, बसणे, उठणे सगळेच खास त्यांचे आहे. त्यातला एखादा इसम इतका हसतो की, त्याच्या नाकातून फसकन् शेंबुड बाहेर येतो; दुसरा हाताच्या बोटाने टेकूण चिरडून रंगीत हात तसाच धोंगड्याला पुसतो. तिसरा चार माणसातही खुशाल धोतरावरुन मांडी खाजवीत राहतो. कुणी विमान कोसळल्यागत हसतो, कुणी उन्हाला पाठ करुन आणि तोंडात तंबाखूची गुळणी धरुन देवासारखा गप्पच बसलेला असतो. बोलताना देखील ही पात्रे विशिष्ट लकबीने बोलत असतात.–

"बैलाची शेपटी पिरगळावी त्याप्रमाणे आपल्या मिशा पिरगाळीत फौजदारांनी विचारले, (माझी पहिली चोरी). "बापमोडे नाकाला लावलेली जीभ परत तोंडात घालून म्हणाला, (कळस). "हळूहळू तुकाचा चेहरा पहिल्यासारखा झाला. तोंडावरच्या ताठ शिरा पुन्हा सैल झाल्या. कपाळावरच्या आठया गेल्या. शांत होऊन तो म्हणाला, (कळस), "डोळे बारीक करुन गणपत उघडे वकिलांच्याजवळ सरकला. मिस्कील आवाजात हळूच म्हणाला, (निकाल). "हेकणा सखाराम आपल्या एकाच धड डोळ्याने त्या पोराकडे निरखून बघत एकदम म्हणाला (चुकामूक), "शिवा बापमोडे नमस्काराची घडी मोडून म्हणाला, (मदत). "नि-याचा घोळ झोकात उचलून खणाखणीत

आवाजात ती म्हणाली, (व्यंकूची शिकवणी). "गणामास्तर रागीट चेअरा करून घुम्यासारखा बसला होता",(मदत). "भिकू मुंगळ्याने अस्खलित-पणे आपले भाषण सुरू केले. एखादी एक्सप्रेस गाडी सुटावी त्याप्रमाणे त्याने आपल्या बोलण्याचा वेग आणला, (वर्गातील एक पाठ).

या लकबी बरोबरच ही इरसाल माणसे मधूनच एखाद्या इंग्रजी शब्दाचा वापर करतात. हे शब्दही ग्रामीण "टच" घेऊन येतात. जसे"टाईम काय आन् गाढवा तू बोलतूस काय ? (मदत), "ह्यें: ! फस्टक्लासची तिकट काढू की. मग हाय का ?" (मुले पळविण्याचा प्रकार). "अशीच कायतरी आडी करायची. बराबर पायंटावर मारायचं. हाय काय न् न्हाई काय.!" (निकाल). "अवं रोज ह्या टायमाला घराकडं येत्यात अन् आजच आलं न्हायीत म्हून पुसाया आले मी" (व्यंकूची शिकवणी), "चल नाना, आपण रजिष्टर करूं" (नव्या-ण्णावबादची एक सफर), "वा राव, तुम्ही अपटुकेट माणसं आन् एवढं कळंना व्हय तुमास्नी ? (हरवल्याचा शोध). "ह्या बुडाला आस्ताच. पाच मिटं झाली" (नव्याण्णावबादची एक सफर), "अगदी कंप्लीट सांगतो सर, "अस-ल्या बाया मास्तर, अर्जंट कळून येत्यात." (व्यंकूची शिकवणी). "सायेब तुमची म्याटर कंपोज करताना टकु-यांतल्या शिरा सारख्या तडातड उडत हुत्या." (माझा कै. वृत्तपत्र व्यवसाय) इत्यादी फर्मास इंग्रजी शब्द मिरासदारांनी इतक्या बारकाव्याने पेरले आहेत की त्यांच्या सुक्ष्म निरिक्षणदृष्टीचा येथे प्रत्यय येतो. त्यांच्या पात्रांचे उद्गार किंवा संबोधने सुध्दा किती तरी वेग-वेगळ्या प्रकाराने व्यक्त होताना दिसतात.

बारा टिकल्यांचा, बोंबलभिक्या, मेंगसमा-या गिलमिशा, छानबाज, साडेशिलटीचा, भरमिट टाळक्याचा, सुतळभोक, रानगटया, भोसडीच्या, बाय-लीला, भडव्या, चाबरटपणा, दोडांनो अशा अस्सल ग्रामीण विशेषणांनी वातावरण निर्मितीला मोठीच मदत केली आहे.

मिरासदारांनी आपल्या कथेतील सर्वच व्यक्तिंचे चित्रण हुबेहुब केले असून

त्या तपशिलाबरोबरच एखाद्या अचूक आणि सुंदर प्रतिमेतून नेमक्या वैशिष्ट्यां-सह ती ती व्यक्ती जिवंतपणे उभी करण्याचे कौशल्यपूर्ण कसबही त्यांनी दाखवून दिले आहे.—

"सोन्याचे हात खडूच्या पकीने माखले होते. चेहरा पांढर फटक झाला होता. नाकाच्या बोंडालाही खडू लागला होता आणि त्यामुळे तो सर्कशीतल्या विदूषकासारखा दिसत होता." (सोन्या बामण),

"नाना (घोडके) तरसासारखा झुलत झुलत तिथे जाई आणि कुठल्या-तरी दगडावर बराच वेळ बसून राही." (नक्याण्णावबादची एक सफर).

"नागू गवळी अंगाने चांगला गुटगुटीत होता. चित्रातला मारुती असतो ना तसा." (झोप)

"एकंदरीत तो एखाद्या भक्कम गाठोडयाप्रमाणे झोपला होता. (झोप)

"असा हा पाटील मनानं दिलदार होता. अरेबियन नाईट्स् मधल्या खलिपासारखा." (गणपत पाटील)

"नाना (घोडके) ला भेटलेल्या पारशिणीचा महालक्ष्मीसारखा मुखवटा होता."

अशा प्रकारे मिरासदारांची भाषा ही त्या, त्या अनुभवविश्वाशी एकजीव झालेली भाषा आहे. वस्तुत: ती संपूर्ण ग्रामीण भाषा नाही किंवा बुध्दी पुरस्पर अधुन-मधुन ग्रामीण भाषेतील वाक्यप्रयोग पेरून ग्रामीण कथासाठी तयार केलेली ती "परिणामकारक" भाषाही नव्हे. ती जितकी ग्रामीण तित-कीच वरवर पाहता नागरीही आहे. भाषेचे स्वतंत्र भान ठेवून योजलेली ती भाषा नव्हे. या भाषेचा अवतार स्वाभाविक आहे. तीत विलक्षण सहजता आहे.

मिरासदारांच्या कथासंग्रहातील कथांच्या भाषेचे स्वरूप वेगवेगळे आहे. ग्रामीण भागातील कोर्ट-कचे-या, शाळा - मुले - मास्तर, एखाद्या व्यक्तिची सवय अधिक असणारी कथा व तिची भाषा, कोणे एकेकाळी मधील ऐतिहासिक

भाषा अशाप्रकारे भाषेचे अनेकविध रंगढंग मिस्कीलपणे मिरासदार वर्णन करतात.

ग्रामीण भाषेतील वाक्प्रचारांचाही वापर ते करतात,–"बेडकी फुगली म्हून काय बैल होत न्हाई (गणपत पाटील),

"बोडकी ती बोडकी अन् वर ही मिजास" (गणपत पाटील)

"आभाळच फाटलं आसंल तर ढिगळ कुठवर लावंल माणूस ? (मदत)

"च्यायला, मास्तर अगदी लिंबाच्या पलीकडचा आहे." (सोन्या बामण)
याशिवाय दातीखाती येणे, गुच्ची मारणे, उचलत्या पौंडाने येणे, कानशिलात इमानानं ठेवून देणे, व्हलपाडीत देणे, बोलून बोलून गाभण करणे, संसाराला हातभार लावणे, लग्नघराचे स्वरूप येणे, चेहरा काळवंडणे, तिखटमीठ लावून सांगणे, पाचवीला पूजणे, कपाळाला आठया घालणे, नक्षा उतरवणे, सर्द होणे, भोंड जिरवणे, एकामागून एक ओवणे, आकरित वाटणे इत्यादी.

"त्यो कडक तर आपूनबी कडक" (निकाल)"गि-हाइकाचा संतोष हाच आमचा फायदा" (माझा कै.वृत्तपत्रव्यवसाय)
यासारख्या म्हणींचाही ते बेमालुमपणे वापर करतात.

मिरासदार कधी कधी ग्रामीण पार्श्वभूमीशी संलग्न असणा-या निसर्गाच्या माध्यमातून, वर्णनातून कथेची सुरवात करतात–

"उत्तर रात्रीचा समय. नदीचे पात्र आता अगदी संथ होते. निःस्तब्ध पाण्याचा विस्तार एखाद्या अजस्त्र स्फटिकमण्याप्रमाणे दिसत होता. तीरावरची वृक्षराजी ध्यानस्त पुरुषाप्रमाणे निश्चल उभी होती. मंद वा-याच्या लहरी अंगाला बिलगत होत्या, आणि शरीरावर बारीक काटा फुलवीत होत्या. उशिरा उगवलेला चंद्रमा आता आकाशमाध्यावर येऊन टेकला होता आणि चांदणे झिरमिरत होते. छायाबहुल वृक्षांच्या दाटीतूनही ही रिमझिम आत पाझरली होती आणि भूमीवर नाना प्रकारच्या रंगवल्लिका उठल्या होत्या. (कोणे एके काळी) [१]

मधूनच-"पूर्वी माण नामे देशात एक खेडेगाव होते. तेथे नाना घोडके नावाचा एक अप्रतिम इसम राहात असे" अशी पुराणपध्दतीची सुरवातही मिरासदार करून जातात तर कुठे त्यांची शैली चित्रमयी बनते.– "कडवाळाचा हिरवा घास चघळत गाय उभी होती. तरारल्या पोटाची ती गाभणी गाय मोठी शोभिवंत दिसत होती. पाठीमागे शेणाचा पाऊ पडला होता. चिपाडाचे तुकडे शेणात लडबडून खाली लोळत होते. पाण्याची डबकी झाली होती. कोंबडीची पिले फर्रर्र करून तिच्या पायामधून जात तेंव्हा शिंगे हलवून ती त्यांना हुसकून लावी. पुन्हा शेपटाने माशा उडवीत कडबा खाई ...... मोठी मजा होती." (माझ्या बापाची पेंड)[१०]

ग्रामीण संकेतही अधून मधून त्यांच्या कथेत येतात व कथेला वास्तवाचा स्पर्श देतात. अमुशाला येताळाची पालखी निघणे, रामनवमीच्या दिवशी रामाची कथा देवळात लावणे, मारूतीला दर शनिवारी वाटीभर तेल घालणे देवाच्या देवळात चांगल बोलणे, एखादी गोष्ट खरी करण्यासाठी महादेवाचा बेल उचलणे, टाचेला भेगा पडल्यातर त्या बुजवण्यासाठी नळयातल वंगण किंवा गाई-म्हशीचा वेतामध्ये पाय बुडवणे इत्यादी पौराणिक संदर्भही कथेत येतात. "जेंव्हा लक्ष्मीने विष्णूला वरले तेव्हा सरस्वती रूसली आणि दरिद्री ब्राम्हणाच्या आश्रयाला गेली" (कोणे एके काळी पृ.९५), "कुंभकर्न हायेत दुसरं तुम्ही. कुनी उठवावं तुमास्नी ?" (झोप पृ.१२१) तसेच ऐतिहासिक दाखले मिरासदार आपल्या कथेत वापरतात. शिवाजी, संभाजी, अफजुलखान, शायिस्तेखान, इब्राहिमखान लोदी, बारभाईचं कारस्थान, कुंजपुरा याबरोबर एखाद्या गोष्टीच्या उदाहरणादाखल म्हणून "मास्तर दिसायला जरा नाना फडणीसासारखे होते, चिडले म्हणजे नादीर शहासारखे हुबेहुब वाटतात. हसले म्हणजे महंमद तुघलकासारखे दिसत असतील का ?" (ड्रॉइंग मास्तरांचा तास, पृ. १८) अशाप्रकारे ऐतिहासिक व्यक्तिंचा ते निर्देश करतात. याबरोबरच अस्सल ग्रामीण शब्दांचा वापर मिरासदार बेमालुमपणे करतात. पटाईत,

इच्यारा, रगड, येरझा-या, अहेर, हबकलोच, जाम, चक्कर, तिरसिंगराव, हात् लेको, होपलेस, छद्, येडबं, लफड्, वक्ताला, डोक्क, अगं बाबौ, हज्जार, मुडद्या, दोडा, फाजील, टिंबा, भाड्या, बधवाल, च्यामारी, भोड, मर्दा, सद्दका, कांड्त, वरवंटा, टक्की, एहेरे पठ्ठे। रुजवात, इरेसरीच्या, बापझक्कत, करवेल, खेटर, बुरंगट या एकेरी ग्रामीण शब्दांबरोबर नवीन ग्रामीण अभ्यस्त शब्दही ते वापरतात - चुकुन-माकुन, बोलणी-वालणी, सूतगूत, महत्वाची-फिहत्वाची, काळानिळा, कल्पना अन् फिल्पना, सक्करनिक्कर, विमान अन् पिमान, बाचकत-बिचकत, सुतळभोक, हो-ना-हो, टोणाच्या टोणा इत्यादी शब्द वापरांमुळे एकंदर लेखनाला वेगळीच लज्जत आली आहे.

अशाप्रकारे भाषाशैलीच्या अनेकविध अंगांनी मिरासदारांची कथा रंजक बनली आहे.

४) निवेदनशैली :

मिरासदारांच्या कथेच्या लोकप्रियतेचे अर्धअधिक यश त्यांच्या निवेदनशैलीमुळे प्राप्त झाले आहे. ग्रामीण जीवनातल्या घटनाप्रसंगासारखा विषय आणि मिरासदारांचा मुळातला गप्पिष्ट, गोष्टीवेल्हाळ स्वभाव यांची चांगली जोड बसलेली आहे. मिरासदारांच्या कथेचे मुळ रूप "गोष्टी"चे आहे. "गोष्ट" असो वा "हास्यकथा" असो ती निवेदकाने सांगायची असते. तिचे स्वरूप लिखित असण्यापेक्षा मौखिक असते.

ग्रामीण जीवनातल्या या कथांचे निवेदन मिरासदारांनी खास गावरान ठसकेबाजपणाने आणि ढंगदारपणाने केले आहे. त्या त्या कथेच्या प्रकृतीप्रमाणे त्यांच्या निवेदनाचा ढंग बदलतो, भाषा बदलते. कथा विषयानुसार मिरासदारांची कथनशैली कशी बदलते हे "नव्याण्णवबादची एक सफर", "कोणे एके काळी", "माझी पहिली चोरी", "माझा के.वृत्तपत्रव्यवसाय",

"मुले पळविण्याचा प्रकार" या कथातून दिसून येते. हे कथनाचे / निवेदनाचे तंत्र खास मिरासदारी पध्दतीचे आहे. या कथानिवेदनाला पारावरच्या गप्पांचे रुप अनेकदा प्राप्त झालेले दिसते. "व्यंकूची शिकवणी", "नव्याण्णवबादची एक सफर", "माझ्या बापाची पेंड" यातील निवेदन वरील प्रकारचे आहे. विनोदी कथाच्या निवेदनात मिरासदार लटके गांभीर्य स्वीकारुन मिस्कीलपणे किस्सा मांडतात. श्रोत्यांच्या मनातला भाव ओळखून नेमका शब्द फेकण्याचे त्यांचे कौशल्य "नव्याण्णवबादची एक सफर","व्यंकूची शिकवणी" मध्ये विशेषत्वाने दिसून येते. चढत्या भाजणीनुसार मिरासदार कथा सांगत जातात. पण अखेरीस अनपेक्षित मिळणाऱ्या कलाटणीमुळे त्या अधिक परिणामकारक होतात. "माझ्या बापाची पेंड", "कळस" "नव्याण्णवबादची एक सफर", "चुकामूक", "हरवल्याचा शोध", "व्यंकूची शिकवणी", "निकाल" या कथा याची सुंदर उदाहरणे होत.

उपहास आणि उपरोध यांच्या वापराने या निवेदनात रंगत भरली आहे. नव्याण्णवबाद नानाची थापेबाजी, व्यंकूची शिकवणी सुरु झाल्यावर मास्तराने तमाशाला जाण्यासाठी सांगितलेली कारणे, भिकू मुंगळयाचा "चहाचे उत्पन्न-आसाम प्रांत-" या घटकावरील सरावपाठ, काका गंभीर या गृहस्थाचे प्रेत ताब्यात घेतेवेळी घडलेल्या घटना, बेबीला वडिलांनी खेडयाविषयी सांगितलेली माहिती, झोंड्या मास्तरांचे पानिपतच्या लढाईचे वर्णन, चुकलेल्या मुलांविषयीचे जमलेल्या मंडळींचे तर्क-वितर्क, संध्याकाळच्यावेळी रस्त्याने भेटलेल्या बाईशी लगट करताना इनामदारांच्या जावयाने दिलेली कारणे यासारखे प्रसंग उपहासपूर्ण, उपरोधपूर्ण निवेदनामुळेच यशस्वी झाले आहेत.

उल्लेखनीय निवेदन कौशल्याचे उदाहरण म्हणून मिरासदारांच्या "नव्याण्णवबादची एक सफर" आणि "व्यंकूची शिकवणी" या कथेतील निवेदनाकडे पहावे लागेल.

SARR. BAL... ...DEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

१. नानाच्या थापेबाजीविषयी लेखक म्हणतो, ..."पुष्कळसे लोक नेहमी खरेच बोलतात आणि मग त्या गप्पांत काहीच चव राहत नाही; गंमत उरत नाही. लोकांना वाटते, आपण नेहमी बेताबेताने बोलावे; फारशा थापा मारू नयेत; पचेल तेवढेच थोडेसे इकडेतिकडे करावे. पण नानाला हे तत्व मान्य नसावे; या बाबतीत त्याची झेप गरूडासारखी होती. इतरांनी ज्या गोष्टी जन्मात कधी कानांनी ऐकल्याही नसत त्या नानाने स्वत: डोळयांनी पाहिलेल्या असत; ज्या लोकांनी केवळ बोललेल्या असत त्या नानाने पूर्ण भोगलेल्या असत. जवळपास जंगल नसले तरी नानाला वेळीअवेळी वाघ भेटत असे आणि नानाला बघितल्यावर एखाद्या देणेक-याप्रमाणे तोंड चुकवीत असे. पौर्णिमा अमावास्येला नानाला एखादा समंध नाही तर मुंजा हमखास भेटायला येत असे आणि नाना त्यांना खायला चिरमुरे शेंगदाणे देत असे व त्यांच्यापाशी चर्चा करीत असे." ११

२. मास्तरला तमाशाची चटक लागली तेव्हा लेखक वर्णन करतो; "तमाशा मी पाहिला ही गोष्ट खरी, पण त्यातल्या अनेक गोष्टी आणि अनेक बोलणी मला नीटशी समजली नव्हती. त्यामुळे त्या शंकांचे त्याच्याकडून निरसन करून घेणे हे मला आवश्यक वाटले. या सगळ्या चर्चेचा निष्कर्ष इतकाच निघाला की करमणुकीच्या या प्रकारात नव्या माणसाला न समजणा-या गोष्टी पुष्कळ असतात. त्यांचा अर्थ शब्दांनी समजावून घेता येत नाही. त्यासाठी पुन्हा पुन्हा तिकडे वळणे हाच एकमेव तोडगा होय. चर्चेचा निर्णय अशा रीतीने लागल्यामुळे नि तमाशाच्या फडाचा मुक्कामही थोडाच उरल्यामुळे मला रोज रात्री कनातीत हजेरी देणे भागच पडले. रात्ररात्र जागून न कळणा-या गोष्टींचे अर्थ लावत बसावे लागले. ते करता यावे म्हणून मला सकाळसंध्याकाळची मेहनत बुडवावी लागली. शरीराचा बांधेसूदपणा गमवावा लागला. गुरुचरित्र आणि मारुतिस्तोत्र ही उत्तम पुस्तके पेटीत कुलूप घालून

ठेवावी लागली आणि आणखी ब-याच गोष्टी कराव्या लागल्या . सुदैव एवढेच की, माझ्या या कार्यक्रमात व्यंकू सदैव माझ्याबरोबर राहिला. त्याने वेळोवेळी मला संदर्भासहित स्पष्टीकरण करून सांगितले आणि मला बहुमोल मदत केली. त्यामुळे माझे या विषयातले अज्ञान हळूहळू नाहिसे होऊ लागले. माझ्या सरळसोट डोक्यात प्रकाश पडू लागला आणि उत्तरोत्तर मी ज्ञानी पुरुष बनत चाललो.[१२]

मिरासदारांच्या निवेदन कौशल्याचे आणखी एक वैशिष्टय म्हणजे त्यांनी आपल्या बहुतांश कथांचे निवेदन लहान मुलांच्या मुखाने केले आहे. त्यामुळे त्यातील निरागस विनोद आणखीनच आकर्षक झाला आहे. "माझ्या बापाची पेंड", "ड्रॉईंग मास्तरांचा तास", "व्यंकूची शिकवणी", "खेडयातील एक दिवस", "सोन्या बामण" या कथाचे निवेदन मिरासदारांनी लहान मुलांच्या मुखाने केले आहे.

६) कथांचे प्रारंभ :

कथेच्या कथानकाच्या मांडणीसाठी आरंभ-मध्य आणि शेवट या तीन गोष्टी महत्वाच्या असतात. कथेचा प्रारंभ कसा करावा हे लेखकाच्या प्रकृतीवर अवलंबून असते. काही लेखक प्रारंभी वातावरणनिर्मितीसाठी निसर्गचित्रण करतात. काही लेखक कथेचा निष्कर्ष सुरवातीस मांडतात. काही लेखक एखादे गुढ किंवा चमत्कारिक घटना सांगून आरंभ करतात. असे असले तरी कथेचा आरंभ हा कलात्मक, नाटयपूर्ण, वाचकामध्ये कुतूहल आणि उत्सुकता निर्माण करणारा असावा असे अपेक्षित असते.

मिरासदारांच्या कथांचे आरंभ कोणात्या प्रकारे होतात हे पाहण्यासाठी त्यांच्या काही कथांच्या आरंभाकडे दृष्टीक्षेप टाकता येईल.

"भावकी"-याकथेची सुरवात मिरासदार उत्कंठावर्धक अशा पध्दतीने करतात. त्यांच्या या कथेच्या सुरवातीच्या वाक्यालाच वाचकाची उत्कंठा वाढते व पुढे काय अशी जिज्ञासा लागते. पहा - "शाळेची घंटा उतावीळ-पणाने वाजली." या एकाच वाक्याने शाळेमध्ये पुढे काय-काय घडणार याची वाचकाला उत्कंठा लागते आणि मिरासदार वाचकाचे लक्ष सुरवातीस खेचून मग सविस्तर निवेदन करतात.

"नव्याण्णवबादची एक सफर" - या कथेची "पूर्वी माण नामे देशात एक खेडे गाव होते. तेथे नाना घोडके नावाचा एक अप्रतिम इसम राहत असे" अशी पुराण पध्दतीची सुरवात करतात आणि नाना घोडके या व्यक्तिचा संबंध जीवनपटच आपल्यासमोर खुलेआम उभा करतात.

"कळस" - या कथेची सुरवात म्हणजे वाचक जणू एखादे गुढ, रहस्य वाचायला, ऐकायला मिळणार म्हणून टवकारतात पहा - "रात्रीचे नऊ वाजले असावेत. सभळीकडे काळा गुडुप अंधार पसरला होता." अशी सुरवात करतात आणि तुका पैलवानाने आपल्या कृतीने कसा "कळस" गाठला हे मिरास-दार रंजकपणे सांगतात.

"हरवल्याचा शोध" - या कथेची सुरवात करताना मिरासदार नैसर्गिक वातावरणाची निर्मिती करतात. पहा -"रोहिण्या - मृगाचे पाऊस पडून गेले होते आणि त्यावर कडाक्याचे ऊन पडल्यामुळे राने हिरवळली होती. रानाचा ओलावा गुडघाभर आत गेल्यामुळे आणि अधूनमधून सारख्या सरी येत राहिल्यामुळे राने ओल धरून होती. चिखल कोठे वाळला होता तर कोठे गाळ साचून राहिला होता. ओढयातून गढूळ पाणी वाहू लागले होते आणि त्या-मुळे आठ महिने झोपून गर्जना करीत उठणा-या कुंभकर्णाची आठवण होत

होती. भाजल्या मातीचा ओला वास आता कोठे येत नव्हता हे खरे; पण नाना प्रकारच्या रानगवताचे वास सगळीकडे सुटले होते आणि मन धुंद होत होते. अशा वेळी सास-याच्या घोडयावर बसून रपेट मारायला मी शिकत होतो. घोड्यावर बसायला मी नुक्ताच शिकलो होतो; आणि आज दुपारच्या वेळी घोडयावरून हिंडायची लहर मला आली होती". अशी सुरवात करून निवेदकाचे घोडे हरवते, आणि उत्कंठा वाढवत वाढवत ते घोडे सापडते असा अनपेक्षितपणे शेवट करतात.

"गणपत पाटील" -"गणपत पाटील मोठा बघण्यासारखा गडी होता" या सुरवातीच्या वाक्यानेच वाचकाचे लक्ष वेधले जाते आणि मग गणपत पाटील कोण, त्याचा स्वभाव, वागणे-बोलणे या सर्वांचा परिचय मिरासदार आपल्या ढंगदार भाषेत करून देतात.

"काकांची गंभीर गोष्ट" - या कथेची सुरवात मिरासदार गंभीरपणे, कथेला शोभेल अशा शब्दात करतात. कोणती तरी गंभीर गोष्ट घडली असावी आणि ती कथा कारुण्यपूर्ण असावी हा वाचकांचा सुरवातीचा समज शेवटी नाहिसा होतो, ते मिरासदारांच्या रंजकशैलीने. - "सरकारी हॉस्पिटलमधील डॉक्टरचे सर्टिफिकेट घेऊन योग्य ते कागदपत्र करून माणसे डेड बॉडीज् वॉर्डकडे वळली तेव्हा अंधार झाला होता. जिकडे तिकडे काळोख पसरला होता, हॉस्पिटलचे क्षीण दिवे हा काळोख चांगलाच दाखवीत होते. त्या अंधारातच झाडांचे शेंडे हलतांना अंधुकपणे दिसत होते. वातावरण निस्तब्ध आणि भयाण वाटत होते. मध्येच एखादा झाडूवाला हातांत खराटा घेऊन इकडेतिकडे जातांना दिसे. एरवी माणसाचा वावर कोठेंच दिसत नव्हता. सगळे कसे निर्जन आणि गंभीर होते."

मिरासदारांच्या कथांचे आरंभ हे कथावस्तूला अनुकूल असे असतात. अनेकदा मिरासदार सरळपणे कथाविश्वात प्रवेश करतात. (झ्रॉइंग मास्तरांचा

तास, माझी पहिली चोरी, सोन्या बामण) तर कधी कथाविश्वाला अनुकूल अशा प्रत्ययकारी वातावरणाची निर्मिती करतात. (कोणे एके काळी, हरवल्याचा शोध, व्यंकूची शिकवणी, चुकामूक) एखाद्या कथेचा पौराणिक पध्दतीनेही आरंभ होताना दिसतो, (नव्याण्णवबादची एक सफर) मिरासदारांच्या कथांच्या आरंभात कोणत्याही प्रकारची चमत्कृती नसते, उलट त्याद्वारे वाचकाला सरळपणे कथाविश्वात प्रवेश करायला लावून चमत्कृतीचे, विसंगतीचे, धक्के मिळत जातात. विनोदकाराने हसू नये, गंभीरपणे विनोद सांगावा तसेच हे प्रारंभ आहेत-आणि म्हणून ते अधिक परिणामकारक आहेत.

७) <u>कथांचे शेवट</u> :

मिरासदारांच्या कथांच्या परिणामकारकतेचे एक कारण म्हणजे या कथांचे शेवट. घटनांच्या क्रमानुसार कथा चढत-चढत पुढे जावी आणि अनपेक्षित कलाटणीने तिचा शेवट व उत्कर्ष साधला जावा, असे कथाकथनाचे खास मिरासदारी तंत्र आहे. कथा वाचण्यापेक्षाही त्या ऐकताना या अनपेक्षित कलाटणीमुळे होणाऱ्या शेवटाचा श्रोत्यांच्या मनावर मोठा परिणाम होतो.

"माझ्या बापाची पेंड" - या कथेत जिच्यामुळे शाळाभर गोंधळ माजला ती पेंड नसुन गांजा असल्याचा उलगडा अखेरीस झाल्याने वाचकाला हास्याची उबळ येते.

कथेच्या शेवटी - "पण भीती एवढीच वाटली की मास्तरांच्या खिशातून पडलेले तुकडे हेडमास्तरांना आवडले तर काय घ्या ! या अनपेक्षित वाक्याने तर ती उबळ आवरता आवरता पूरेवाट होते आणि हास्याचा कडेलोट होतो.

"नव्याण्णवबादची एक सफर" या कथेचा शेवटही उल्लेखनीय आहे. लग्नासाठी पथ्य म्हणून आपली थापेबाजी बंद करणारा नाना अखेर लग्न होत नाही म्हणून वैतागून डोहात उडी घेतो, लोक त्याला वाचवतात.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

तो शुद्धीवर येतो. उशापायथ्याला बसलेली माणसे पाहून त्याचा मूळ स्वभाव उफाळून येतो. "अरे, त्या डव्हात एक जलकन्या राहती. आसरा राहती. मला काय ठावं न्हायी. म्या सूर मारला आन् तिन गपकन् पाय धरला माजा. मला म्हणाली, "नाना, चल माज्या घरात कायम -हा. आता तुला सोडत न्हायी". त्याच्या या उद्गारांनी वातावरण अद्भूततेने भरून जाते. नानाच्या आयुष्याला पुन्हा एकदा अर्थ येतो आणि नानाची कल्पक थापेबाजी सुरू झाल्याचे पाहून वाचकालाही हरवलेले गवसल्याचा आनंद होतो. ही कलाटणी विलक्षण सहज, मानवी मनाची संगती राखून आल्याने शेवट कलात्मक होतो.

"झोप" - नागूच्या गाढ झोपेने चोराची चांगलीच फजिती होते. तो पहाटे काळे तोंड घेऊन चोरी न करताच निघून जातो. रात्रभरच्या गोंधळाचा नागूवर कोणताच परिणाम नाही. सकाळी उजाडल्यावर कपाळावरच्या जखमेत हळदचूना भरता भरता नागू बायकोला म्हणाला -

"अगं, एवढा मोठा चोर येऊन गेला घरात. मला उठवायचं न्हायीस ?
आँ ? .... चांगल भुस्कट पाडलं आसत की त्येचं मी. हयँ: । ....
दाब चान्स आला हुता. पर घालवलास तू..." पण हे बोलताना

देखील नागूला शीण आला... आणि मग त्याला एकदम झोपच आली. पराक्रमाची इच्छा प्रकट करता करताच स्वाभाविकपणे झोपेच्या आधीन होणारा नागू पाहून वाचकही अपेक्षित परिणामाच्या दर्शनाने प्रमुदित होतो.

"गणपत पाटील" - या कथेचा शेवटही कलाटणी देणारा आहे. आपल्या भावकीतल्या विधवा बाईविरूद्ध जमिनीच्या कारणावरून केस ठेवतो. पण पाटील केस हरतो. म्हणून तिच्या "खोपटाला आग लावतो. मग मात्र बाई शरण येते तेव्हा पाटील बाईला म्हणातो, "आगं, उगी गंमत केली म्या. मला काय कळत न्हाई व्हय ?" आणि जवळ बसलेल्या आपल्या माणसांकडं पाहून तो ओरडला, "काय बगताय गाडवीच्यांनो तोंडाकड ? जावा लवकर.

बाईची कोप हुभा करून द्या. आनू दोन पांच गडीमाणंस घेऊन तिथं खळंबी करून द्या. पळा ...."

"निकाल" - कथेचाही शेवटचा निकाल पाहण्यासारखा आहे. गणपत वाघमोडेंनी आपली दत्तकविधान केस नामांकित उघडे वकिलांवर सोपविली. पण वकिलालाही केस आपण जिंकू असे वाटत नाही. आणि निकाल गणपतसारखा लागल्यावर आश्चर्य वाटते. गणपत वाघमोडे आपला पायंट आणि आडी वकिलाला सांगतो -

"साहेब पैसे खात न्हाई म्हून तुमीच बोलला न्हवं ? कुनी पैसे द्यायला लागलं तर निकाल विरूद्द देतो त्यो. व्हय कां न्हाई ? मग तीच आडी केली म्या. मी दुस-या माणसाबरोबर पैसे लावून दिलं त्येंच्याकडं. नांव मात्र सांगितलं विरूद्द बाजूचं. मग जे साहेब भडाकलाय म्हनतां! अरारारा ! काय इचारू नगा. न्हाई न्हाई त्ये बोलला त्या माणसाला. पुन्हा फळांची करंडी पाठवली. भाजी पाठविली. जास्तच भडकला गडी. मग काय ? निकाल आपल्यासारका!"

याशिवाय व्यंकूला शिकविणा-या मास्तरने त्याचीच विद्या शिकून त्याचीच बाई आपण ठेवून-"ती हल्ली माझ्याकडे असते" असे अभिमानाने सांगणे, घोडयाच्या शोधात वणवण हिंडून थकलेल्या नायकाला तरणीताठी बाई भेटणे तिच्यासोबत चालण्याचा, लगट करण्याचा आनंद उतू जात असता नेमके चार पुरूष गडयांनी हरवलेले घोडे घेऊन येणे, चोरीमुळे हरवलेला स्वास्थ पुन्हा मिळविण्यासाठी सभ्य, प्रतिष्ठित नायकानेच अखेर शेजारच्या भिंतीला छिद्र पाडून चोरी करणे, नव-याच्या घरून पळालेल्या ज्या उठवळ बाईबद्दल देवळात चर्चा होते तीच नेमकी तुका पैलवानाने ठेवणे, असे हे शेवट त्या त्या कथांची परिणामकारकता वाढविण्यास उपयुक्त ठरले आहेत. मिरासदारांच्या बहुतेक कथांना मिळालेल्या कलाटण्या या चमत्कृतीतून आलेल्या आहेत.

कथेच्या अंशाच्या आणि वाचकावर होणाऱ्या अंतिम परिणामाच्या दृष्टीने कथेचे शेवट महत्त्वाचे असतात आणि त्यादृष्टीने मिरासदारांच्या कथांचे शेवट हे लक्षवेधक आणि परिणामकारक ठरतात.

मिरासदारांच्या कथांचे वाङ्मयीन गुणविशेष आपण येथे पाहिले. कथाकार म्हणून त्यांच्या कर्तृत्वाची अभ्यासपूर्ण नोंद काही अभ्यासकांनी घेतली आहे. त्यातील काही अभिप्राय लक्षणीय आहेत.

वा.ल. कुलकर्णी मिरासदारांच्या कथेबद्दल लिहितात,-"तिच्यात एक मिस्कीलपणाची झाक आहे. नुसत्या मिस्कीलपणाचीच नव्हे, तर गमतीदार, विक्षिप्तपणाची. त्यांच्या कथांमधून हा जो मिस्कीलपणा वा गमतीदार विक्षिप्तपणा जाणवतो, तो घटनांनी घेतलेल्या चमत्कृतिपूर्ण वळणांनी केवळ निर्माण झालेला नसतो. ही मजेदार वळणे तर तेथे आढळतातच; परंतु तो त्या घटनांना कारण झालेल्या, माणसांच्या ठिकाणच्या सर्वसाधारण आणि थोड्याफार लोकविलक्षण अशा दोन्ही प्रकारच्या वृत्तीतून जन्मलेला असतो. अशा प्रकारच्या जीवनात विशेषत: खेड्यातल्या बिनपोशाखी जीवनात निर्माण होणारे प्रसंग हेरण्यात आणि कल्पिण्यात मिरासदार कोण्याही मराठी कथा लेखकाला हार जाणे कठीण आहे." १३

मिरासदारांच्या कथासंबंधी डॉ. द.ता. भोसले लिहितात;-"मिरासदारांनी मराठी विनोदी कथेचे एक वेगळेच रुचिर दर्शन घडविले, एक स्वतंत्र दालन निर्माण केले. शहरी संस्कार झालेल्या नागर मनाला आपल्या वर्तनादर्शापेक्षा वेगळ्या प्रकारचे जे आदर्श जाणवलेले असतात, त्यातील विसंगती शोधण्यासाठी किंवा ती शोधून मांडण्यासाठी काही वास्तवता काही कल्पकता घेऊन, तिला अतिशयोक्तीची जोड देऊन विशिष्ट मानवी स्वभावाचे नमुने अधिक हास्यास्पद करून किस्सेवजा स्वरूपात मांडणे ही पध्दत प्रा. द. मा. मिरासदारांनीच प्रामुख्याने सुरू केलेली आहे. त्यामुळेच त्यांचा विनोद कोणातीही

जखम करीत नाही, सामाजिक जीवनावर उपरोधिक स्वरूपाचे भाष्य करीत नाही अथवा टीका करीत नाही. वाटल्यास त्याचे सौम्य स्वरूपाचे विडंबन करण्याकडे त्यांचा कल झुकलेला आपणास काही कथांमधून थोडाफार जाणवेल." [१४]

तर डॉ. आनंद यादव म्हणतात;- "मिरासदारांची कथा ही शुध्द स्वरूपाची मनोरंजक विनोदी कथा आहे. तिला मानवी दु:खाच्या अंतर्मुखतेचा आणि गंभीरतेचा स्पर्श झालेला नाही. अर्थात त्यामुळे तिच्या मनोरंजक, निखळ विनोदाला काहीच कमीपणा येत नाही. केवळ गंमतीमुळे विनोद प्रसन्न वाटतो. ग्रामीण पार्श्वभूमीवर तर तो मोठा खुमासदार वाटतो. वाचकाचे खूप मनोरंजन करतो. मिरासदारांनी पत्करलेल्या भूमिकेला भरपूर यश देतो." [१५]

द.मा. मिरासदारांच्या एकुणच कथा लेखनाविषयी म.ना. अदवंत लिहि-तात,- "मिरासदारीकथा" या नावाने ओळखल्या जाणा-या त्यांच्या हास्यप्रधान कथांतून मिस्किलपणा तर दिसतोच; पण ग्रामीण जीवनातील विसंगती, विक्षि-प्तपणा, इरसालपणा इत्यादी अनेक गोष्टी अचूक टिपण्याचे आणि त्यांचा परिणामकारक रीतीने आविष्कार करण्याचे त्यांचे सामर्थ्यही त्यातून प्रत्ययाला येते. मिरासदारीकथेचा विशेष हा की, ती एका विशिष्ट वातावरणातच अधिक रंगते. .... त्यामुळे त्यांची ग्रामीण विनोदी कथा एकदम निराळी वाटते.- खास त्यांची अशी वाटते." [१६]

वासुदेव मुलाटे मिरासदारांच्या कथेबद्दल लिहितात;- "ग्रामीण कथेतील वेगळेपण, तिची लोकप्रियता वाढीस नेणे आणि केवळ शाब्दिक कोटया न करता प्रसंगनिष्ठ कथेद्वारे माणसांच्या स्वभावातील विसंगती, वैशिष्टये दाखविली हे त्यांचे मराठी ग्रामीण कथेतील महत्त्वाचे यश आहे. हसत-हसत माणसाच्या वैगुण्यावर, दोषावर बोट ठेवून लिहिलेल्या विनोदी कथांनी ग्रामीण कथेत वेगळेपण नोंदवले. हा ग्रामीण कथेच्या विकासातील एक टप्पाच आहे." [१७]

सारांश :

या प्रकरणामध्ये आपण मिरासदारांच्या कथालेखनातील वाङ्मयीन गुणवैशिष्ट्यांचा अभ्यास केलेला आहे. द.मा. मिरासदारांच्या सर्वच कथा-वस्तू या दैनंदिन जीवनानुभवातून आलेल्या आहेत. त्यामध्ये विविधता आहे, वास्तवता आहे. कथा म्हटले की व्यक्तिचित्रण आलेच. मिरासदारांचे कथा-विश्व अनेक प्रकारच्या, स्वभावांच्या वल्लींनी आणि व्यक्तींनी गजबजलेले आहे. त्यांची कथा अखेर व्यक्तिंचीच असते. त्यांना रस आहे माणसांत. माणसां-मध्ये ते रमतात. म्हणूनच त्यांच्या व्यक्तिरेखा लक्षणीय अशा उतरल्या आहेत.

मिरासदारांच्या कथेमध्ये संवादाला इतर घटकांबरोबरच महत्त्वाचे स्थान असते. संवादामुळे पात्रांचे स्वभावदर्शन घडते तसेच कथा पुढे सरकत राहण्यास मदत होते. मिरासदारांचे संवाद हे ज्या त्या पात्रानुरूप आहेत. संवादासाठी बोली चा वापर ते करतात त्यामुळे हे संवाद स्वाभाविक बनले आहेत. मिरास-दार प्रत्ययकारी संवादाद्वारे आपल्या कथावस्तुचा उत्तम विकास करतात.

मिरासदारांची भाषाशैली ही खास त्यांची आहे. ज्या ग्रामीण जीवना-तून ते आलेले आहेत त्या जीवनानुभूतीतून त्यांची भाषाशैली अवतरते. मिरासदा-रांच्या कथेतील ग्रामीण जीवनाशी निगडित असणाऱ्या उपमा, उपमाने, वाक्-प्रचार, शब्दप्रयोग, म्हणी हे भाषाशैलीचे घटक त्यांच्या कथा सजग बनविण्यास मदत करतात.

मिरासदारांच्या खास अशा निवेदनशैलीमुळे त्यांच्या कथांना लोकप्रियता लाभली आहे. त्यांच्या मुळच्या गप्पिष्ट स्वभावामुळे त्यांच्या कथेच्या निवेदन-शैलीला अधिक बहार आला आहे. ग्रामीण जीवनातल्या या कथांचे निवेदन मिरासदार खास गावरानपणे, ठसकेबाजपणे करतात. तसेच निवेदनासाठी त्यांनी केलेला लहान मुलांचा कौशल्यपूर्ण वापर हे खास मिरासदारी तंत्र होय. या

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

लहान मुलांच्या निवेदनांमुळे कथेची लज्जत वाढली असून कथा खुमासदार बनल्या आहेत.

मिरासदारांच्या कथांचे प्रारंभ हे उल्लेखनीय आहेत. कथेच्या सुरवातीस ते वाचकांचे लक्ष वेधून घेतात आणि मग प्रारंभापासून शेवटपर्यंत वाचकांचे भान सुद्धा देत नाहीत. मिरासदारांच्या कथांची सुरवात साचेबंद, कृत्रिम नाही. त्यामध्ये विविधता आहे. मिरासदारांच्या बहुतेक कथांचे शेवट हे उल्लेखनीय आणि चमत्कृतीतून झालेले आहेत. मिरासदारांची कथा घटनांच्या क्रमानुसार पुढे-पुढे सरकत राहते आणि अचानक चमत्कृतीपूर्ण शेवट होऊन वाचकाला हास्याचा फवकारा देते. कथेच्या शेवटाचे "खास मिरासदारी" तंत्र आहे. त्यांच्या कथांचे शेवट हे त्या त्या कथांची परिणामकारकता वाढविण्यास उपयुक्त ठरेले आहेत. कथेच्या शेवटी मिळालेल्या चमत्कृतीपूर्ण कलाटणीमुळे मिरासदारांच्या कथा वाचकांच्या चांगल्या स्मरणात राहतात. उत्कंठा वाढवत वाढवत ते उच्च बिंदूपाशी वाचकाला नेतात आणि अनपेक्षितपणे कलाटणी देऊन कथेचा शेवट करतात. कथेच्या या अनपेक्षित कलाटणीमध्ये मिरासदारांचा हातखंडा आहे.

"माझ्या बापाची पेंड" आणि "गप्पागोष्टी" या दोन्ही कथासंग्रहातील कथांची पर्यायाने मिरासदारांच्या कथांच्या वाङ्मयीन गुणवैशिष्टयांचा मागोवा आपण येथे घेतला. पहिल्या प्रकरणापासून या चौथ्या प्रकरणापर्यंत मिरासदारांच्या कथांचा आशय आणि त्यातील विनोदाचे स्वरूप", "मिरासदारांच्या कथेतील व्यक्तिरेखा", आणि "मिरासदारांच्या कथालेखनाचे वाङ्मयीन गुणविशेष" या घटकांचा संशोधनात्मक अभ्यास केला. या अभ्यासाच्या निष्कर्षांची मांडणी सुत्रबध्दरीतीने करावयाची आहे.

.....

## प्रकरण चौथे

## संदर्भ ग्रंथ


| | | |
|---|---|---|
| १) प्रा. कुलकर्णी दा.वि. | : | मराठी कथा: स्वरूप आणि आस्वाद, स्वाध्याय महाविद्यालय, पुणे, १९७६, पृ.६७ वरून उद्धृत. |
| २) उपरोक्त [१] | : | पृ. ६७ वरून उद्धृत |
| ३) मिरासदार द.मा. | : | "माझ्या बापाची पेंड", सुपर्ण प्रकाशन, पुणे, तृतीयावृत्ती, पुनर्मुद्रण, १९९०, पृ.१११-१२. |
| ४) मिरासदार द.मा. | : | "गप्पागोष्टी" कुलकर्णी ग्रंथालय, पुणे, प्रथमावृत्ती, १९६३, पृ. १२६-२७. |
| ५) उपरोक्त [४] | : | पृ. ५२-५३. |
| ६) उपरोक्त [४] | : | पृ. ६८-६९. |
| ७) उपरोक्त [३] | : | पृ. ९५. |
| ८) उपरोक्त [३] | : | पृ. ३६-३७. |
| ९) उपरोक्त [३] | : | पृ. ७६ |
| १०) उपरोक्त [३] | : | पृ. २-३ |
| ११) उपरोक्त [३] | : | पृ. २८-२९. |

| | | | |
|---|---|---|---|
| १२) | उपरोक्त [3] | : | पृ. १३६. |
| १३) | मिरासदार द.मा. | : | "मिरासदारी", कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, तिसरी आवृत्ती, १९८०, पृ.९ |
| १४) | डॉ. भोसले द.ता. | : | "ग्रामीण साहित्य : एक चिंतन" मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती, १९८८, पृ.३५. |
| १५) | डॉ. यादव आनंद | : | "ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि समस्या" मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, द्वितीयावृत्ती, १९८४, पृ.५१-५२. |
| १६) | संपा. जोग रा.श्री. | : | "प्रदक्षिणा", कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, सातवी आवृत्ती, १९८०, पृ. १८५. |
| १७) | डॉ. मुलाटे वासुदेव | : | "ग्रामीण कथा; स्वरूप आणि विकास" स्मिता प्रिंटर्स, पुणे, प्रथमावृत्ती १९९२, पृ. २८. |


.....